Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## December-2022

ISSUE No - (CCCLXXX.) 380-B

## 75 Years of Indian Economy: Opportunities and Challenges




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. M.N. Kolpuke
Principal
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga Dist. Latur

**Editor**
Dr.Sheshera S. Devnalkar
Head, Department of Economics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga Dist. Latur

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

Impact Factor-8.575 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar


## Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**December-2022**

**ISSUE No - (CCCLXXX.) 380-B**

## 75 Years of Indian Economy: Opportunities and Challenges




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. M.N. Kolpuke
Principal
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga Dist. Latur

**Editor**
Dr.Shesherao S. Devnalkar
Head, Department of Economics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga Dist. Latur

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



| | | |
|---|---|---|
| 20 | सेंद्रिय खताचा वापर शेतकऱ्यांसाठी फलदायी प्रा.डॉ.बी.आर.शिंदे | 78 |
| 21 | स्वातंत्र्यानंतर भारतातील ग्रामीण स्थलांतराची कारणे, परिणाम व त्यावरील उपाय डॉ.एम.डी.कच्छवे | 81 |
| 22 | भरडधान्ये उत्पादन आणि आहारातील महत्व प्रा. डॉ. पाते शिवाजी बाबुराव | 85 |
| 23 | भारतातील दारिद्र्याची समस्या व उपाय डॉ. अशोक टिपरसे नागेश रामदास पतंगे | 90 |
| 24 | महाराष्ट्राच्या आर्थिक विकासातील प्रादेशिक असमतोल डॉ.सुनिता लिंबराज गुजर | 96 |
| 25 | भारतीय अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरणाचे परिणाम डॉ. बालाजी तुळशिराम घुटे | 99 |
| 26 | भारताच्या दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमावर दृष्टिक्षेप प्रा बालासाहेब शिवाजी पवार | 103 |
| 27 | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीची भूमिका प्रा.डॉ. मौलाना महेताब सय्यद | 106 |
| 28 | जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था रविकुमार चंद्रकांत माने | 110 |
| 29 | भारतातीललोकसंख्या, दारिद्रय आणि बेरोजगारीचा प्रश्न प्रा.डॉ. खोकले आर. के. | 114 |
| 30 | डिजीटल चलन आणि आभासी चलन एक विहंगावलोकन प्रा डॉ. डी. बी. कोनाळे | 120 |
| 31 | वर्तमान काळातील शेती क्षेत्राचे आंतरराष्ट्रीय व्यापारिक योगदान प्रभाकर वसंत पगार , डॉ. अजय वासुदेव काटे | 125 |
| 32 | अकरावी पंचवार्षिक योजना - एक दृष्टीक्षेप प्रा.डॉ.पलमंटे माधव पांडूरंगराव | 130 |
| 33 | भारतातील पंचवार्षिक योजनांचा आढावा प्रा.डॉ.संजय काळे | 136 |
| 34 | भारतातील दारिद्र्य – एक जटील समस्या प्रा.शशिकांत दिवाण भामरे | 140 |
| 35 | शेती आणि भारतीय अर्थव्यवस्था प्रा डॉ. डी. पी. कांबळे | 146 |
| 36 | **भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीची भूमिका प्रा. कांबळे शिल्पा बळीराम** | 148 |
| 37 | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीची भूमिका प्रा. डॉ. पवार एस.व्ही. | 150 |
| 38 | भारतातील बँकाच्या राष्ट्रीयीकरणाची 50 वर्षे: सद्यस्थिती व भवितव्य डॉ. प्रा.सौ. मंडले एस.यु | 155 |
| 39 | भारतीय स्वातंत्र्याचे 75 वर्ष व भारतातील मूलभूत सुविधांचा विकास प्रा.अमोल अरुण पगार , डॉ.विकास विनायकराव सुकाळे | 162 |
| 40 | भारतातील दारिद्र्याचा प्रश्न आणि अनुसूचित जाती-जमाती एक विश्लेषण प्रा.डॉ.एल.एच. पाटील | 166 |
| 41 | आत्मनिर्भर भारत : चुनौतियाँ और समाधान प्रा.डॉ.रामकिशन मांजरे | 172 |

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXX.) 380 - B
ISSN : 2278-9308
December, 2022

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

# स्वातंत्र्यानंतर भारतातील ग्रामीण स्थलांतराची कारणे, परिणाम व त्यावरील उपाय

डॉ.एम.डी.कच्छवे
वाणिज्य विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ जिल्हा परभणी.

प्रस्तावना (Introduction): भारतातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून ही शेती निसर्गावर अवलंबून आहे. कधी कमी पावसाने तर कधी जास्त पावसाने कोणत्या ना कोणत्या भागात दुष्काळ पडलेला पाहावयास मिळतो .अशा परिस्थितीमुळे अनेक कुटुंबाला आपल्या मूलभूत गरजा राहत असलेल्या ठिकाणी भागवीता येत नाहीत त्यामुळे त्यांना स्थलांतर करावे लागते .मानवी इतिहासात जगण्यासाठी रोजगारासाठी आणि नवीन कांही शिकण्यासाठी कायमच स्थलांतरित होताना पाहावयास मिळतात .दंगली ,युद्धे अत्याच्यार अशा विविध कारणामुळे स्थलांतरित होताना पाहावयास मिळते. मानवाने अनेक वर्षापासून स्थलांतर केल्याचे आढळून येते .औद्योगिक क्रांतीनंतर समाजामध्ये उद्योग धंद्यामध्ये वाढ झाली त्यामुळे भारतात स्वातंत्र्योत्तर काळापासून ग्रामीण भागातून शहरी भागात मोठ्या प्रमाणात स्थलांतर होताना दिसते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी व्यक्ती जाण्याच्या क्रियेस स्थलांतर असे म्हणतात. स्थलांतरामध्ये व्यक्तीच्या स्थलांतराचे ठिकाण ,हेतू व कालावधी या तीन घटकांना महत्त्वपूर्ण स्थान देण्यात आले आहे. आधुनिक काळात रोजगारांच्या शोधात स्थलांतराचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. शहरी विचारसरणीने प्रभावित व आपल्या उत्पन्नात वाढ घडून आणून आपले राहणीमान व जीवनमान उंचावण्यासाठी लोक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करतात. ग्रामीण भागातील प्राप्त परिस्थितीचा अंदाज घेऊन लोक शहराकडे नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने स्थलांतर करतात. छोट्या खेड्यामध्ये उपजीविकेची साधने उपलब्ध होत नाही त्यामुळे ग्रामीण भागातील लोक आपल्या गावातून दुसऱ्या गावात स्थलांतरित होतात .शहरी भागात औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे रोजगार मिळण्यास अधिक संधी असतात त्यामुळे ग्रामीण भागातील लोक शहराकडे वळतात .ग्रामीण भागातील उच्चशिक्षित लोकांचे प्रमाण आज वाढत असून बौद्धिक कौशल्याच्या क्षमतेवर आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थलांतराचे प्रमाण वाढत आहे. ग्रामीण भागातील लोक ही रोजगार शिक्षण कौटुंबिक गरजा पूर्ण करण्यासाठी राहत्या ठिकाणापासून आर्थिक साधनांसाठी स्थलांतरित होत आहेत.

• संशोधनाचे उद्देश :

संशोधनाचे उद्देश खालील उद्दिष्टानुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

1) स्थलांतराची प्रस्तावना पाहणे.
2) स्थलांतरणाच्या कारणांचा अभ्यास करणे.
3) स्थलांतरणाची परिणाम शोधणे.
4) स्थलांतरणावर उपाय सुचवणे.
5) निष्कर्ष काढणे.

• संशोधनाची गृहीतके :

संशोधनाची गृहीतके खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

1) ग्रामीण भागात बारमाही रोजगार मिळत नसल्यामुळे लोक शहराकडे वळत आहेत.
2) ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून शेती व्यवसाय सध्या अडचणीत सापडलेला आहे त्यामुळे लोक शहराकडे वळत आहेत.

• अभ्यास पद्धती :

वरील उद्दिष्टानुसार शोधनिबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला असून त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, दैनिक वर्तमानपत्रातील अग्रलेख, & इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आलेला आहे.

• स्थलांतराची कारणे :

1) शहरी भागात रोजगारांच्या संधी :

औद्योगिकीकरणामुळे शहरांचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. जास्तीत जास्त उद्योगांची निर्मिती झाली त्यामुळे रोजगारांच्या संधी उपलब्ध झाल्या म्हणून रोजगारासाठी ग्रामीण भागातील युवक शहराकडे स्थलांतरित होत असताना पाहावयास मिळतात.

2) उच्च शिक्षणाच्या सुविधा :

शिक्षण ही प्राथमिक गरज असताना देखील ग्रामीण भागात उच्च शिक्षणाच्या सुविधा नसल्यामुळे ग्रामीण भागातील युवक उच्च शिक्षणासाठी शहरी भागात जात आहेत. शहरी भागात बहुविद्याशाकीय शिक्षण पद्धती उपलब्ध असल्यामुळे लोक शहराकडे वळत आहेत.

3) भूमिहीन शेतमजूर :

भारतात दिवसेंदिवस ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे त्या प्रमाणात शेती क्षेत्र वाढत नाही त्यामुळे शेती क्षेत्रात रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत त्यामुळे भूमिहीन शेतमजूर शहराकडे वळत आहेत .ग्रामीण भागातील शेतमजूर शहराकडे गेल्यामुळे शहरे दिवसेंदिवस फुगत असून खेडी ओस पडत आहेत.

4) वाहतुकीच्या सुविधा : अलीकडच्या काळामध्ये दिवसेंदिवस शहर फुगत आहेत पायाभूत सुविधांची संख्या वाढत आहे त्यामुळे ग्रामीण भागातील लोक शहरी भागाकडे आकर्षित होत आहेत.

5) श्रीमंत वर्गातील लोकांचे शहरी भागाकडे आकर्षण :

ग्रामीण भागापेक्षा शहरी भागामध्ये मोठ्या प्रमाणावर सुखसोयी असल्यामुळे आणि चैनीच्या गरजा शहरात भागविणे शक्य असल्यामुळे खेड्यात राहणारा श्रीमंत वर्ग शहराकडे आकर्षित झाला आहे त्यामुळे खेडी ओस पडत असून दिवसेंदिवस शहरी भागाची लोकसंख्या वाढत आहे.त्यामुळे शहरात नवीन समस्या निर्माण होताना दिसत आहे.

6) आर्थिक स्तर उंचावणे :

स्थलांतर हे फक्त एका गावातून दुसऱ्या गावात होत नसते तर एका राज्यातून दुसऱ्या राज्यात आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी लोक स्थलांतर करताना पाहावयास मिळतात. आर्थिक स्थर उंचावण्यासाठीच लोक ज्या ठिकाणी सर्व सुविधा आहेत रोजगार मिळू शकतो अशा ठिकाणी स्थलांतर करताना पहावयास मिळतात.

• स्थलांतराचे परिणाम :

1) रोजगाराची समस्या :

रोजगार मिळविण्यासाठीच ग्रामीण भागातून शहरी भागामध्ये स्थलांतर होत असते परंतु सर्वच त्या व्यवसायामध्ये प्राविण्य मिळवलेले नसतात बऱ्याच जणांना त्या व्यवसायातील कामे जमत नाही. बऱ्याच वेळा शहरी भागात सर्वांना रोजगार मिळत नाही, हाताला काम न मिळाल्यामुळे शहरात गुन्हेगारी वाढत जाऊन विविध प्रकारच्या समस्या निर्माण होत असतात.

2) वाढती गर्दी :

स्थलांतरामुळे शहरी भागात वाढती गर्दी ही समस्या बनली आहे. शहरामध्ये अनेक वेगवेगळ्या ठिकाणी लोकांची गर्दी वाढल्यामुळे प्रशासनाला या वाढत्या गर्दीला नियंत्रित करणे अवघड झाले आहे त्यामुळे चेंगराचेंगरी अशा दुर्घटना दिवसेंदिवस होत आहेत.

3) प्रदूषणात वाढ :

ग्रामीण स्थलांतरामुळे प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होत आहे शहरांमध्ये, वाहनांची संख्या वाढलेली असून त्याचबरोबर कारखाने कंपन्या वाढल्याचे दिसून येते .शहरीकरणामुळे झोपडपट्ट्यांची संख्या वाढत आहे. शहर फुगल्यामुळे वृक्षतोड आणि स्वच्छता वाढत आहे.त्यामुळे पर्यावरणाला हानी पोहोचत आहे. ध्वनी प्रदूषण वाढत असल्यामुळे लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

4) मूलभूत गरजा :

ग्रामीण भागातील लोक शहरी भागाकडे विविध कारणामुळे जात असल्यामुळे शहरी भागात वीज ,पाणी ,आरोग्य ,स्वच्छता इत्यादी जीवनाशक वस्तूंचा तुटवडा निर्माण होत आहे.

5) आर्थिक समस्या :

ग्रामीण भागातील लोक विविध कारणामुळे शहरी भागात आल्यामुळे त्यांना शहरी भागात सुखसोयी देणे प्रशासनाला अवघड होऊन बसले आहे. अनेक सेवा सुविधा पुरविण्यासाठी पैशाची गरज असते .त्यांना अधिक खर्च होत असल्यामुळे अनेक नागरी सुविधा दिल्या जात नाहीत.

6) शिक्षण क्षेत्र :

ग्रामीण भागातील शैक्षणिक सुविधा शहरांच्या तुलनेत कमी असल्यामुळे ग्रामीण लोकांचे शहराकडे स्थलांतर होण्याचे प्रमाण जास्त आहे वाढत्या शहरीकरणामुळे शहरांची लोकसंख्या वाढत असून याचा शहरी प्रशासनावर परिणाम होताना दिसत आहे. शहरी प्रशासन आपल्या शहरी समाजास शैक्षणिक मोठ्या प्रमाणात देऊ शकत नाही .लोकसंख्या वाढल्यामुळे त्या प्रमाणात शैक्षणिक सुविधा सुद्धा अपुऱ्या पडत आहेत.

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXX.) 380 - B
ISSN : 2278-9308
December, 2022

7) वाढती झोपडपट्टी :

ग्रामीण स्थलांतरामुळे शहरात राहण्याची अडचण असल्यामुळे लोक मोकळ्या जागेवरती आपल्या वस्त्या निर्माण करतात.या वस्त्या बेकायदेशीर जागेवरती असतात. या झोपडपट्ट्यामुळे वाहतुकीला अडचणी निर्माण होतात. रोगराई, अवैध धंदे इत्यादी अनेक प्रश्न निर्माण होत असतात.

8) स्वच्छता :

ग्रामीण भागातील लोक शहरी भागात स्थलांतरित झाल्यामुळे शहरातील कचरा वाढतो .कचरा साठविण्यासाठी जागाही कमी पडतात. ओला आणि सुका कचरा एकत्र केला जातो त्यामुळे रोगराई वाढवून त्याचा आरोग्यावर परिणाम होतो.

9) गुन्हेगारीत वाढ होते :

रोजगार प्राप्त करण्यासाठी ग्रामीण भागातील लोक शहराकडे स्थलांतरित होत असतात. स्थलांतरित झालेल्या सर्वच लोकांना शहरांमध्ये रोजगार मिळेलच याची शाश्वती नसते. ज्या लोकांच्या हाताला काम मिळत नाही अशा मधूनच गुन्हेगारी जन्माला येते स्वतःची उपजीविका भागविण्यासाठी काम न मिळाल्यामुळे गैरमार्गाचा अवलंब करून लोक पैसा कमविण्याचा प्रयत्न करत असतात .सुरुवातीला छोट्या छोट्या गुन्ह्यातूनच मोठे गुन्हे करायला सुरुवात करतात याचा परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावर होत असतो.

10) सांस्कृतीक व सामाजिक देवाणघेवाण होते :

स्थलांतरणांमुळे विविध प्रदेशातील किंवा देशातील लोक एकमेकांच्या सहवासात येतात त्यामुळे दुसऱ्या भागातील चालीरीती ,खाण्याच्या पद्धती, भाषा इत्यादी गोष्टीची माहिती लोकांना मिळते .स्थलांतरित झालेल्या व्यक्ती नाही नवीन प्रदेशातील समाजव्यवस्था लोकांची श्रद्धा संस्कृती यांचे ज्ञान होते.

- स्थलांतरावरील उपाय योजना

1) ग्रामीण भागात रोजगारांची निर्मिती करणे :

ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी कमी असल्यामुळे लोक शहरांमध्ये स्थलांतरित होतात ग्रामीण भागात रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्यास लोक शहराकडे स्थलांतरित होणार नाही शासनाने या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे .रोजगार हमी सारखे योजना राबवून रोजगारांचे आणखी संधी ग्रामीण भागात निर्माण केल्या पाहिजेत.

2) कृषी आधारित उद्योगांची निर्मिती करणे :

ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.या शेती व्यवसायावर ग्रामीण भागातील लोक अवलंबून आहेत.शेतीतील अनिश्चिततेमुळे उत्पादन होत नाही लोकांना रोजगार मिळत नाही त्यामुळे लोक शहराकडे जात आहेत अशा परिस्थितीमध्ये जर ग्रामीण भागात कृषीवर आधारित उद्योग मोठ्या प्रमाणात निर्माण झाले तर तेथील किंवा त्या परिसरातील लोकांना रोजगार प्राप्त होईल त्यासाठी शासनाने कृषीवर आधारित उद्योगाला चालना दिली पाहिजे.

3) कृषी अनुदान देणे :

भारतातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून शेती व्यवसायाचा विकास घडून आल्यास लोकांच्या स्थलांतराचे प्रमाण कमी होईल त्यासाठी शासनाने कृषी सहाय्यासाठी धोरणात्मक उपाय राबविले पाहिजे.सिंचनाच्या सुविधा, पिक विमा योजना ,वेळच्यावेळी कर्ज पुरवठा दिल्यास कृषी क्षेत्रात त्यांना फायदा होतो

04) नीम शहरांची निर्मिती करणे :

ग्रामीण भागातील स्थलांतरणांमुळे शहरी भागात अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत त्यामुळे शहरावरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी नीम शहरे विकसित करणे आवश्यक आहे .नीम शहरे ग्रामीण भाग व शहरी भाग यामध्ये दुवा साधण्याचे काम करतात त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या गरजा स्थानिक पातळीवरच पूर्ण होतात.शहराकडे येणारा लोंढा तिथेच थांबतो त्यासाठी निम शहर तयार होणं फार गरजेचे आहे.

05) पायाभूत सुविधांचा विकास :

भारत हा खेड्यांचा देश आहे .ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे त्यामुळे ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास करणे महत्त्वाचे आहे.पायाभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे लोक शहराकडे जातात.अत्याधुनिक सुविधा ग्रामीण भागात उपलब्ध करून दिल्यास शहराकडे येणारा लोंढा हा ग्रामीण भागातच थांबेल.त्यासाठी ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास होणे फार महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ शुद्ध जेल पुरवठा, पशु चिकित्सालय ,शाळा,दवाखाने,इंटरनेट सुविधा ,करमणुकीची साधने इत्यादी.

06) रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे :

डिजिटल शहरांप्रमाणे डिजिटल खेडे तयार केली पाहिजे.ग्रामीण भागातील लोकांना शेती शिवाय दुसरा रोजगार नसल्यामुळे ग्रामीण भागात वेगवेगळे कौशल्य कार्यक्रम आयोजित करण्यात यावे तसेच प्रशिक्षित लोकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी अर्थसाह्य उपलब्ध करून दिल्यास रोजगार मिळू शकेल त्यामुळे ग्रामीण स्थलांतर थांबविता येईल.

07) शेती पूरक व्यवसायाचा विकास करणे :

शेतकऱ्यांना शेती व्यवसायाबरोबरच दुग्ध व्यवसाय, कुकुट पालन, शेतीसाठी आवश्यक अवजारे निर्मिती, वराह पालन यासारखे पूरक व्यवसाय निर्माण करणे फार महत्त्वाचे आहे. यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल तसेच शेती मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे.

08) ग्रामविकासाचे महत्त्व पटवून देणे :

ग्रामस्वराज्याची संकल्पना ही महात्मा गांधी यांनी मांडली.या अंतर्गत स्वयंपूर्ण खेडे यांना महत्त्व दिले.खेडे डिजिटल बनविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत .खेड्याचे वातावरण शुद्ध व आरोग्याला पोषक असते.त्याच ठिकाणी लोकांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्यास लोक शहराकडे जाणार नाहीत.

09) उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण करणे :

स्वातंत्र्यानंतर केंद्र व राज्य सरकार मार्फत देशाचा औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले .या प्रयत्नातून देशात नवनवीन उद्योगधंदे उभारली.काही प्रमुख शहरात उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे शहरी भागात रोजगाराच्या निमित्ताने लोक येऊ लागली.लोकांना बारमाही रोजगार मिळू लागला .त्यामुळे ग्रामीण भागात उद्योगधंदे सुरू केल्यास ग्रामीण भागातील लोंढा थांबविण्यासाठी उद्योगधंद्याची विकेंद्रीकरण करणे महत्त्वाचे आहे .

• निष्कर्ष :

भारतातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून ही शेती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे कधी कमी पावसाने तर कधी जास्त पावसाने कोणत्या ना कोणत्या भागात दुष्काळ पडलेला पाहावयास मिळतो या कारणामुळे बारमाही काम शहरात मिळते म्हणून खेड्यातील लोक शहराकडे वळत आहेत आणि खेडी वस पडत आहेत. खेड्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न होणे फार गरजेचे आहे त्यासाठी खेडे सुद्धा डिजिटल बनवावेत. खेड्यामध्ये जी भेडसावणारे जे प्रश्न आहे ते प्रश्न सोडविले पाहिजेत. खेड्यांचा विकास म्हणजेच तालुक्याचा विकास तालुक्याचा विकास म्हणजे जिल्ह्याचा विकास आणि जिल्ह्यांचा विकास म्हणजे विभागाचा विकास विभागाचा विकास म्हणजे राज्यांचा विकास आणि राज्यांचा विकास म्हणजेच देशांचा विकास हे समीकरण तयार होईल. त्यासाठी खेडे विकसित होणे फार महत्त्वाचे आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :

01) डॉ.सुनील पवार आणि विजय देसाई : ग्रामीण अर्थशास्त्र ,सक्सेस पब्लिकेशन, पुणे.
02) डॉ.उर्मिला रेड्डी: लोकप्रशासनातील कौशल्य विकास कार्यक्रम, अरुणा प्रकाशन, लातूर.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani